पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- २५/११/२०१९

## बाल न्यायमंडळ आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने न्यायिक विभाग आणि पोलीस विभागाची संयुक्त कार्यशाळा.

### प्रत्येकाने सामाजीक बांधीलकी जपने काळाची गरज- मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायधीश श्री. मेहरे यांचे प्रतिपादन

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली, जिल्हा बालसंरक्षण, बाल न्यायमंडळ आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण गडचिरोली यांचे संयुक्त विद्यमाने पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायधीश गडचिरोली श्री. आर. एन. मेहरे सा. यांचे अध्यक्षतेखाली न्यायिक विभाग व पोलीस विभागाची संयुक्त कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

सदर कार्यशाळेचे उद्‌घाटन अपर पोलीस अधीक्षक श्री. मोहिती कुमार गर्ग यांचे उपस्थितीत सहा सत्र न्यायधीश जिल्हा न्यायालय गडचिरोली श्री. बी. एम. पाटिल सा. यांनी केले. सदर कार्यशाळेत वरील मान्यवरांव्यतीरीक्त उपविभागीय पोलीस अधिकारी गडचिरोली श्री. सुदर्शन सा., श्री. प्रदिप चौगावकर सा. पोलीस निरीक्षक पोस्टे गडचिरोली, श्री. गोरख गायकवाड सा. प्रभारी पोलीस उप-अधिक्षक (गृह), श्री. उल्हास भुसारी सा. पोलीस निरीक्षक, श्री तुनकलवार सा. पोलीस निरीक्षक, श्री सगने सा. सहा. पोलीस निरीक्षक, पोउपनि कदम, म.पोउपनि पुनम जगताप तसेच गडचिरोली जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी (तपासी अंमलदार) हजर होते.

पोलीस व न्याय विभागाने बालकांचे संदर्भातील गुन्ह्यात विशेष संवेदनशिलता व सहीष्णुता बाळगुन कायद्याने दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही व्हावी या हेतुने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेत मा. मेहरे सा. यांनी अध्यक्षीय व मार्गदर्शनपर भाषणात बालकांचे लैंगिक शोषणांपासुन संरक्षण अधि. २०१२ (pocso Act) व प्रत्येक मनुष्य

हा समाजाचा मुख्य घटक असुन त्याचे अस्तित्वच समाजावर अवलंबुन असते. त्यामुळे प्रत्येक मनुष्य हा समाजाला देणे लागतो. ही भावना बाळगुन कर्तव्य पार पाडल्यास गुन्हेगारीला आळा घालुन स्वच्छ व निर्मळ समाजाची निर्मीती करता येईल, असे प्रतिपादन केले. तर मा. बोरफळकर सा. यांनी बालन्याय मुलांची काळजी व संरक्षण अधि. २०१५ बाबत सर्व तपासी अंमलदारांना सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच श्रीयुत पाटिल सा. यांनी पोलीसांचे तपासादरम्यान होत असलेल्या लहान- लहान त्रुट्यामुळे आरोपीस कसा फायदा होतो व त्या त्रुट्या कश्या दुर केल्या जावु शकतात. याबाबत मार्गदर्शन केले. श्री वाशीमकर सा. यांनी गरजु लोकांना कश्या रीतीने कायदेशीर मदत व मार्गदर्शन मिळु शकते याबाबत मार्गदर्शन केले. श्री. पंचोली सा. यांनी मा. सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय यांचे नविन न्यायनिर्णय व त्या अनुषंगाने कायदा राबवितांना काय काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेत बालकल्याण समितीच्या अध्यक्ष सौ. सविता साधमवार यांनी पिडीत बालकांना कसे हाताळावे व त्यांना न्याय मिळवुन देण्याकरीता पोलीस विभागाने कसे कार्य करावे याबाबत मार्गदर्शन केले.

सदर कार्यशाळेत पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडचणीबाबत मनमोकळेपणाने चर्चा केली व प्रत्येक व्याख्यात्यांनी त्यांच्या अडचणीचे अत्यंत साध्या सोप्या भाषेत निराकरण केले.

मा. अपर पोलीस अधीक्षक श्री गर्ग सा. यांनी सदर कार्यशाळेचे न्यायविभागाचे व बालकांसाठी जिल्ह्यांतर्गत काम करणाऱ्या स्वंयसेवी संस्थाचे विशेष आभार मानुन कार्यशाळेची सांगता केली.